

सत्यमेव जयते

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
# नागपूर

**दिनांक २८ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर २०११**

दरम्यान संपन्न झालेल्या
आपत्ती व्यवस्थापन जनजागृती अभियान
पंधरवाडयाचा वृत्तांत


आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर.
सहर्ष सहभाग
आपत्ती व्यवस्थापन
जनजागृती अभियान पंधरवाडा
दिनांक २८ सप्टेंबर ते १२ ऑक्टोबर, २०११ पर्यंत





## आपत्ती सौम्यीकरण प्रतिज्ञा

आज दिनांक २८ सप्टेंबर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या वर्धापन दिनी मी प्रतिज्ञा करतो/करते की, माझे स्वत:चे, भोवताली असलेल्या सर्व सजीवांचे आणि राष्ट्रीय संपत्तीचे सर्व प्रकारच्या आपत्ती पासून संरक्षण करणे हे माझे कर्त्यव्य आहे.

आपत्ती ही नैसर्गिक असो किंवा मानव निर्मित, सुरळित चाललेल्या दैनंदिन जीवनात व्यत्यय आणते, आणि धोकादायक परिस्थिती निर्माण होउन, ईजा, जीवितहानी तसेच वित्तिय आणि पर्यावरणीय नुकसान पोहचवते.

अशा आपत्तीं पासून बचाव करण्यासाठी आणि धोक्यांची तीव्रता कमी करण्यासाठी योग्य तऱ्हेचे ज्ञान, सराव, तंत्रज्ञान उपकरण, सुरक्षा प्रणाली आणि सतर्कता या सर्वांचा मी उपयोग करेन. मी स्वत: आणि इतर सर्वांना या गोष्टींचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न करेन.

सर्व समाज आणि आपल्या येणाऱ्या पिढया सुरक्षित, निर्धोकपणे आणि सुखा-समाधानात नांदाव्यात यासाठी मी कटिबध्द होत आहे.

अपरुप अडावदकर
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी,
नागपूर



- आपत्ती व्यवस्थापन जनजागृती अभियान पंधरवाडा अंतर्गत नागपूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तर्फे निरनिराळया जागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- २८ सप्टेंबर रोजी पंधरवाडयाचे औपचारिक उद्घाटन मा. निवसी उपजिल्हाधिकारी नागपूर यांचे शुभहस्ते झाले. या प्रसंगी सर्व उपस्थितांनी ''आपत्ती सौम्यीकरण प्रतिज्ञा'' घेतली.
- २९ सप्टेंबर रोजी भारत पेट्रोलीयम बोरखेडी येथे आयोजीत करण्यात आलेल्या मॉक ड्रील मध्ये सहभाग आणि जागृती.
- जवाहर हायस्कुल काटोल रोड नागपूर येथे ३० सप्टेंबर रोजी आपत्ती सौम्यीकरण जागृतीपर कार्यक्रम तेथील विद्याथ्यांसाठी आयोजीत करण्यात आला.



- १ ऑक्टोबर रोजी हनुमान नगर नागपूर येथील स्थानिक लालबहादुर शास्त्री विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन.
- ४ ऑक्टोबर रोजी सुपर स्पेशलीटी हॉस्पीटल नागपूर येथे प्राध्यपकांच्या प्रशासकीय परिषदेत आपत्ती व्यवस्थापन या विषयावर भाषण.
- धम्म चक्र प्रवर्तन दिना निमीत्त स्वयंसेवकांना प्रशिक्षण आणि मॉक ड्रिलचे आयोजन दिनांक ५ ऑक्टोबर रोजी.
- ६ ऑक्टोबर रोजी दीक्षा भूमी येथे आपत्ती सौम्यीकरण विषयक जनजागृती.




- ज्ञानवाणी एफ एम साठी मुलाखत रेकार्डींग ७ ऑक्टोबर रोजी विषय आपत्ती व्यवस्थापन जनजागृती अभियान पंधरवाडा.
- यशोदा हायस्कुल नागपूर येथे आपत्ती विषयक जनजागृती कार्यक्रम दिनांक ८ ऑक्टोबर रोजी.
- आपत्ती व्यवस्थापन जनजागृती तसेच कवायतीचे आयोजन सी.पी. ॲन्ड बेरार कॉलेज महाल नागपूर येथे दिनांक ११ ऑक्टोबर.
- पंधरवाडयाचा समारोप दिनांक २२ ऑक्टोबर रोजी भारतीय सेवा मंडळ यांच्या सहाकर्याने, नरेंद्र नगर नागपूर या ठिकाणी स्थानिक आमदार श्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला.

# जनता को आपदा प्रबंधन की जानकारी जरूरी : फडणवीस




## प्रशिक्षण व मार्गदर्शन शिविर हुआ

स्थानीय प्रतिनिधि

नागपुर. भारतीय सेवा मंडल व जिला आपदा प्रबंधन प्राधिकरण के संयुक्त तत्वावधान में नरेन्द्रनगर में 'विभिन्न आपदाओं में सुरक्षा कैसे करें' विषय पर जनजागृति शिविर का आयोजन किया गया. प्रमुख रूप से विधायक देवेन्द्र फडणवीस, जनमंच के अध्यक्ष अनिल किलोर, भारतीय सेवा मंडल के संस्थापक सचिव राम आखरे, जिला आपदा प्रबंधन अधिकारी अपरूप अडावतकर, विपदा बचाव-तंत्र विशेषज्ञ डा. राजेन्द्र गुंडलवार, अरविंद शेट्टी आदि मंच पर उपस्थित थे.

## जरूरी है आयोजन

विधायक फडणवीस ने आयोजन की सराहना करते हुए कहा कि सामाजिक कार्यकर्ताओं व सामान्य लोगों को आपदा प्रबंधन के विषय में जानकारी देने के लिए ऐसे कार्यक्रमों का आयोजन जरूरी है ताकि समय पड़ने पर वे स्वयं का और दूसरों का बचाव कर सकें. अडावतकर और डा. गुंडलवार ने भूकम्प, बम विस्फोट, बाढ़, दुर्घटना तथा विभिन्न आपदाओं की सीडी के माध्यम से मार्गदर्शन किया. संचालन राम आखरे तथा आभार प्रदर्शन अन्नाभाऊ मेश्राम ने किया. इस अवसर पर प्रभाकर महल्ले, कु.द.दाभोलकर, प्रमोद वानखेड़े, गणेश खर्चे, नितिन शेंदरे, प्रमोद पांडे, ममता भोयर, पुरुषोत्तम कोहालकर, गजानन काकुलकर, हेमराज वानखेड़े, दिलीप नरवड़िया, अमरीश सावरकर, मनोज बागड़े, खरसने पाटिल, ज्योति इंदुरकर, कालबांडे आदि की उपस्थिति रही.

# सुरक्षेविषयी नागरिकांनी सावध राहावे

## आ. देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

वार्ताहर

नागपूर, २२ ऑक्टोबर

नैसर्गिक असो किंवा इतर आपत्ती सांगून येत नाही. अशावेळी आपण घाबरून न जाता व्यवस्थित त्या स्थितीचा सामना करावा. सुरक्षाविषयी नागरिकांनी नेहमीच सावध राहावे, असे मत आ. देवेंद्र फडणवीस यांनी मांडले.

भारतीय सेवा मंडळ नागपूर आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व आपत्तीमध्ये सुरक्षा कशी करावी या विषयावर जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात जनमंचचे ॲड. अनिल किलोर, राम आखरे, डॉ. राजेंद्र गुंडलवार, अपरूप अडावतकर, अरविंद शेट्टी, प्रभाकर महल्ले, कु. द. दाभोळकर, प्रमोद वानखेडे, गणेश खर्चे, नितीन शेंदरे, प्रमोद पांडे, ममता भोयर, पुरुषोत्तम कोहळकर, गजानन काकुलकर, हेमराव वानखेडे, दिलीप नरवडीया, अमरीश सावरकर, मनोज बागडे, खरसने पाटील, ज्योती इंदूरकर, काळपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यक्रमात डॉ. राजेंद्र गुंडलवार व अपरूप अडावतकर यांनी आपत्तीजनक घटनेच्या चित्रफिती दाखवून नागरिकांना मार्गदर्शन केले. अपघात व नैसर्गिक घटना वारंवार होत आहेत. अशावेळी घाबरण्याचे कारण नाही. त्यावेळी धैर्याने संकटाचा मुकाबला करा. याकरिता सामाजिक कार्यकर्त्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्याचीही गरज असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी मांडले. संचालन राम आखरे, तर आभारप्रदर्शन अण्णा मेश्राम यांनी केले.


जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
जनजागृती कार्यक्रम


आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जन सेवा ही राष्ट्र सेवा



## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

जिल्हाधिकारी कार्यालय, नागपुर-४४० ००१
फोन : २५६२६६८, २५६०५४३
टोल फ्री : १०७७